# [redacted] र खेली

चिं. त्र्यं. खानोलकर

PANDIT CENTRE FOR FUNDAMENTAL RESEARCH IN INDIAN THEATRE
Date..........
ESTD. 1981

प्रमोद प्रकाशन, पुणे ३०.

1976 आ ।

सदर नाटकाचा व्यावसायिक रंगभूमीवरील प्रथम प्रयोग 'नाट्य-सुविधा, पुणे' या संस्थेने दि. ६ नोव्हेंबर १९७५ रोजी रात्रौ ९॥ वाजता 'बालगंधर्व रंगमंदिर, पुणे' येथे सादर केला. त्यातील कलाकार व तंत्रज्ञ—

कलाकार

| | | |
|---|---|---|
| पद्मनाभ काळे | : | अरुण सरनाईक |
| अपर्णा | : | सौ. सुमन धर्माधिकारी |
| विष्णु | : | राघवेंद्र कडकोळ |
| दयाळ | : | धनंजय भावे |
| नीता | : | कु. नूतन पुराणिक |
| राजेंद्र | : | नरेंद्र डोंगरे |
| प्रिया | : | कु. ज्योति चांदेकर |

| | | |
|---|---|---|
| संगीत | : | भास्कर चंदावरकर |
| गीते | : | आरती प्रभू |
| पार्श्वगायन | : | कु. फैय्याज व रवींद्र साठे |
| प्रकाश-योजना | : | बाळ मोघे |
| रंगभूषा | : | निवृत्ती दळवी |
| वेषभूषा | : | अनंत जोशी |
| सजावट | : | अनिल पित्रे, रमा कवठेकर |
| व्यवस्था | : | डॉ. नेरकर |
| दिग्दर्शन व नेपथ्य | : | भालचंद्र पानसे |
| निर्माता | : | सुभाष नमाडे |
| निर्मिती प्रमुख | : | जे. एन्. खडसे |

### : थीम सॉंग :

दु:ख ना आनंदही अन् अंत ना आरंभही
नाव आहे चाललेली कालही अन् आजही
मी तसा प्रत्यक्ष नाही ना विदेही मी जसा
मी नव्हे की बिंब माझे मी न माझा आरसा
एकला मी नाहि जैसा नाहि नाही मी दुणा
मी नव्हे स्वामीहि माझा मी न माझा पाहुणा
प्रश्न की उद्गार नाही अधिक नाही वा उणा
जीवनाला ऐल नाही पैल तैसा मध्य ना
याद नाही साद नाही ना सखी वा सोबती
नाद आहे या घड्याला अन् घड्याच्या भोवती
सांध्यछाया आणि काया जोडुनी यांचा दुवा
नाव आहे चाललेली दूरची हाले हवा
दु:ख ना आनंदही अन् अंत ना आरंभही
नाव आहे चाललेली कालही अन् आजही

## अंक पहिला

(पद्मनाभ काळ्यांचा बंगला. सुसज्ज दिवाणखाना. दिवाणखान्याच्या दोन्ही अंगांना खोल्या आहेत. पंखे, झुळझुळीत पडदे, श्रीमंतीला शोभेसे फर्निचर, फोन, रेडिओ वगैरे. वेळ साधारणतः दुपारची आहे. राजेन्द्र दारापाशी उभा आहे. गुलाबाचा गुच्छ घेऊन एक गृहस्थ येतो.)

गृहस्थ : काँग्रॅच्युलेशन ! म्हानशी भेट. (गुच्छ देतो.) फार बरे वाटले—डॉक्टर झालात.

राजेंद्र : थँक्यू ! वा वा, बरं वाटलं.

गृहस्थ : (हसत हसत जातो.)

राजेंद्र : ( दार बंद करतो. फोनची रिंग होते. मधल्याच एका खोलीतून पद्मनाभ काळ्यांची नीता नावाची मुलगी, वय वर्षे सतरा-अठरा, मोठ्या उत्सुकतेने बाहेर येते. फोनचा रिसीव्हर उचलते.)

नीता : हॅलो, ( चेहऱ्यावरची उत्सुकता कमी होते.) थांबा हं. राजू ... रे राजू ...घे तुझा फोन, अभिनंदनाचा.

राजेंद्र : (रिसीव्हर घेतो.) हॅलो ...थँक्स. अं ? काय म्हणालात ? नो नो, दवाखाना घालून काय होतंय हो ? अमेरिकेला जाईन म्हणतो. अच्छा. (रिसीव्हर खाली ठेवतो. नीताकडे पाहून) काय म्हणताहेत आमच्या नीताताई ? तुमचा चेहरा उतरला का ? त्यांचा फोन नव्हता म्हणून ? येईल, येईल हं ! रावसाहेब पद्मनाभ काळे यांचा मुलगा डॉक्टर होतो ही घटना काही साधीसुधी नव्हे. येतात फोन अभिनंदनाचे !

नीता : मी काही म्हटलं का ?

राजेंद्र : चेहरा बोलतो ना.

( पुन्हा फोनची रिंग. नीता पटकन फोनकडे वळते. राजेंद्र हसतो म्हणून ओशाळून मागे होते.)

नीता : राजू, माझा फोन आलाय असं म्हणत नाही मी. उचल.

राजेंद्र : आणि ताईसाहेब तुमचाही असू शकतो.

नीता : मुळीच उचलणार नाही. हवा तर उचल. थट्टा तरी किती ऐकून घ्यावयाची ? आता डॉक्टर झालास तरी अजून तुझा बालिशपणा गेलेला नाही. डॅडींच्या थोरल्या मुलाला हा बालिशपणा मुळीच शोभत नाही. (रिसीव्हरवर हात ठेवते.)

राजेंद्र : ओः ! हा स्पर्श तिकडे त्याला जाणवला असेल !

नीता : (पटकन हात उचलते.) पण मी म्हणते फोनची रिंगच नुसती सुरू ठेवायची का ?



राजेंद्र : असं मी मुळीच म्हटलेलं नाही. मी काहीच म्हटलेलं नाही. टेक अ चान्स.

नीता : हे बघ, मला असं वाटतयं की दंडाला चांगला कडकडून चिमटा घ्यावा.

राजेंद्र : ताईसाहेब, नीताबाई, हेच वाक्य रिसीव्हरमधून त्याला सांगा ना ! आम्ही पाहिजे तर आत जातो.

नीता : ( आता मात्र खरोखरच चिडते.) राजेंद्र, आता फार झालं हे ! हा पेपरवेट सुद्धा मारीन मी ! हो, सांगून ठेवतो.

(आतून अपर्णा येते. आणि त्याच वेळी कोपऱ्यात उभा असलेला विष्णू कौतुकानं हसतो.)

नीता : तू कशाला हसतोयस ? गंमत वाटली का ?

विष्णू : म्याच कशाला, रावसाहेब सुदीक हसले असते इथे असते तर.

अपर्णा : (वय वर्षे ४०–४५ च्या दरम्यान. सुडौल बांधा, रुबाबदार व्यक्तिमत्त्व, आकर्षक देखणेपणा. प्रत्येक हालचालीत खानदानी रुबाब.) विष्णू, तुला मधे हसण्याचं काही कारण नाही.

विष्णु : वयनीसाब, आता नाही हसनार. बहीन-भावांचं भांडन ऐकून हसायला आलं. आता शपथ नाही हसनार. आपलं काय जातंय ?

अपर्णा : राजेंद्र, अरे फोनची रिंग होतच राहिलीय. ठीक आहे. मी म्हणते, तुम्ही दोघांनी तो फोन घेऊ नका. तुमचं असंच. तुमचं दोघांचं पटायचं म्हणून नाही कधी.

( दूर उभा असलेला विष्णू पटकन हसतो.)

अपर्णा : तू कशाला हसलास पुन्हा ?

विष्णु : तळपट होतो माझा. आता ही जीभ तरी कापायला पाहिजे. खुळ्यासारखं हसूच येतं. वयनीसाब, ही जन्माची सवय माझी. आता नाही हसनार.

अपर्णा : (रिसीव्हर उचलते.) हॅलो, (क्षणार्ध गप्प राहते. चेहरा उतरतो.) हॅलो, मला वाटलं रॉंग नंबर असावा. (पण रिसीव्हर खाली ठेवत नाही.)

(नीता उठून मोठ्या उत्सुकतेने तिच्या मागे उभी राहते.)